# राघववेळ कादंबरीचे वांङ्यीन मूल्यमापन

**कु. पद्मा वि. नागदेवे**
संशोधकविद्यार्थी
एल.ए.डी. कॉलेज, शंकर नगर, नागपूर
मो.नं.-९९२३९८५०३२
Email – padmanagdeve358@gmail.com

---

**सारांश :**

*'राघववेळ' या कादंबरीला साहित्य अकादमीचा आणि राज्यशासनाचाही पुरस्कार मिळाला. या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे वास्तविक चित्रण केलेले आहे. या कादंबरीत एका मांग कुटुंबाची कथा सांगितली आहे. राघववेळ' या कादंबरीचे वांङ्यीन मूल्यमापन करतांना कादंबरीतील संवाद, वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, संघर्ष, वातावरण, स्त्री भाषा आणि पुरुष भाषा इत्यादींचा या शोधनिबंधात अभ्यास करण्यात येणार आहे.*

***बीज शब्द*** *- राघववेळ, कादंबरी, वालंबी, ग्रामीण, वांङ्य*

---

**गृहीतके -**

'राघववेळ' या कादंबरीतील मुख्य पात्रे आणि गौण पात्रे यांचे संवाद जिवंत आहेत. ही कादंबरी ग्रामीण बोलीभाषेत असून लेखकाची निवेदन पद्धती ही प्रमाणभाषेत आहे. विशिष्ट परिस्थितीत पुरुषभाषा व स्त्रीभाषा ही बदलत असते. वातावरणानुसार व्यक्तीच्या आयुष्यात चढ,उतार दिसून येतो. या कादंबरीतील नायीकीनीचा संघर्ष तिच्या प्रतिकूल परिस्थितीशी आहे.

**संशोधन पद्धती -**

'राघववेळ कादंबरीचे वांङ्यीन मूल्यमापन' या शोध निबंधात ग्रंथालयीन अभ्यासाद्वारे सिद्ध होणारे संशोधन आहे. प्रस्तुत संशोधनात चिकित्सक पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्रस्तावना -**

**संवाद** - कादंबरीतील मुख्य पात्रे आणि गौणपात्रे यांच्यातील संवादातून कादंबरी उभी राहते.कथानकाला वेग संवादामुळे येते. वाचकांना पात्रातील भावना विश्व संवादातून समजतो. त्या पात्राचा स्वभावगुण समजतो. या कादंबरीत वऱ्हाडी भाषेचा उपयोग केला आहे.

"वालंबी पावसाला उद्देशून बोलते, 'काहून रे वैऱ्या? उघड काहू न आत्ता तरी? स्वतःची समजूत घालून स्वतःला बोलते. 'त्यो का घरेल बांधले हये कोणाचा, हे म्हणलनं की येयाले, आन थांब म्हणलं थांबायले ?" आपल्या मनातील भावना मनात न ठेवता स्पष्टपणे बोलल्या जाते. पाऊस कधीच कुणाचं ऐकत नाही. आपल्याला माहित असतानाही पाऊस थांबणार नाही, तो कोणाचा ऐकत नाही किंवा कुणाला बांधील नाही. तरी अगदी सहजपणे मनुष्य बोलून जातो. आपल्या मनातील भावना व्यक्त करतो. " माये लय भूक लागली व्हती, रोज रोज भाजीची भाकर खाऊन कंटाळा आल्यानं खाल्ली आम्ही त्याची भाकर करून."[२] रघु चे हे बोलणे ऐकून वालंबीला वाईट

वाटते. आपण रोज मुलांना भाकरी मध्ये भाजी घालून बनवून देतो. ते खाऊन खाऊन मुलं कंटाळलेली असतात. पण आता मात्र नुसती भाजी कशी बर खायला घालावी. मुलांना काय जेवण द्यावं हा प्रश्न वालंबीला पडला. वालंबी पायरुला म्हणाली "जोडा पाय." तेव्हा पायरू म्हणाला, 'मी लहान ह्ये, मलेच आशीर्वाद द्या तुम्ही,' "उल्ट व्हते ते पायरु : नाही, तुम्हीच उलट करायल्या."[३] दसऱ्याच्या दिवशी थोडा मोठ्यांचे दर्शन घ्यायचे असते. त्यांचा पाया पडून आशीर्वाद घ्यायचे असते. हा रिवाज वालंबी पाळते व मुलंही पाडतात. दीराच्या पाया पडावयास वालंबी जाते. तर पायरू तिला पाया पडू देत नाही. उलट वालबीला म्हणतो, 'मी तुमच्या पाया पडावयास हवे.' मोठ्या भावजई बद्दल पायरूच्या मनात आदर, मान आहे हे यावरून दिसते. 'बरं केलं बाप्पा'[४] वालंबी रघूला रागवली नाही. उलट रघूने डॉक्टर कडे जाऊन सितारामला औषध गोळ्या आणले यावरून रघूची सिताराम बद्दलची काळजी तर दिसतेच पण वालंबीची होत असलेली द्विधा मनस्थिती यातून दिसते. आपल्याला शेतात कामावर जावे लागते. कारण घर बसल्या आपल्याला कोण ज्वारी देणार? मुलाला बरं नसूनही त्याच्याजवळ राहू शकत नाही. म्हणून वालंबीचे मन सिताराम भोवती फिरते. त्याचे रडू पाहून भरून येते. असे भावपूर्ण प्रसंग रंगविले आहे. कळणुने मरते वेळी वालंबीला म्हणाले, 'वालंबी, मले जा वाटते का ? पण जाणं तर ह्ये... लेकराकडं पाह्य आता." नवर्याचे हे बोलणे वालंबीला आठवायचे तेव्हा तीला वाटायचे, "हो गेलं तुम्ही. पण एकटी कुठे ह्ये मी ? लेकरं ह्येत. त्यानंच एकटं वाटयचं, नाही. त्याह्यच्या साठीच जगायचं आपल्याले"[५] आपल्या मुलाला जगवणं ही वालंबीच्या जगण्याची प्रेरणा या संवादातून व्यक्त होतो.

**प्रतिमा-**

'लिव्हणं वाघाचा डोळा ह्ये.' या वाक्यात वाघाचा डोळा प्रतिमा आहे. 'कौसाचे डोळे ही पावसाळी आभाळागत झरू लागले.' या प्रतिमेत उपमा अलंकार आहे. 'ज्याचं ताट त्यो खाणारचं' यामध्ये म्हणीचा उपयोग केलेला आहे. 'निजानीज झाली आणि कौशीचा अंथरुणाला आग आली. येथे सुचक शृंगार योजलेला आहे. 'एकाच वेळी शिशिर अन् वसंताचा अनुभव घेत होती ती.' येथे विरोधाभास प्रतीत होतो. 'त्याच्या डोक्यात असंख्य प्रश्न मधाच्या पोळयाला धक्का असून मधमाशा घोंगाव्यात तसे घोंगावू लागले.' येथे उपमा अलंकार वर्णिला आहे. 'आता आव झड ही अशी खरजच्या खाजवाची नाव घेईना झाली.' या प्रतिमेतून ग्रामीण वास्तव दुगोदर होताना दिसते. 'पायरू बैलगाडीला अडकवलेल्या वंगणाच्या नळयासारखा त्याचे मागे चाल नं.' या वाक्यात प्रतिमा योजलेली आहे.

**म्हणी -**

राघववेळ या कादंबरीत म्हणींचा वापर अतिशय सुंदर पद्धतीने केला आहे. म्हणी वापरताना अनेक वेळा यमक साधण्याचा प्रयत्न केला आहे. 'घरोघरी मातीच्या चुली', 'सीताहून भाताची परीक्षा', 'बारभाई खोती आन् बाफऱ्या लागेना हाती', 'खायाले भागो भागो आन् कामाले आग लागो', 'येळंला केळ, नवसाले सिताफळ', 'पचलं तसं खावावं आन् सोभलं तसं लेवावं माणसानं', 'पाळायाना पोसाय, फुकट डोळे वासाय', 'उगीच येडी व्हऊन पेडा नोको खाऊ', 'गरीब काय आणि पोटात पाय', येळ न वकत आन् कोळमं काखत.

**वाक्प्रचार -**

घोड्याच्या पोटाला बांधणे, झाड बाळ पाडून अंगावर घेणे, कंबर बांधणे, जीव टांगणीला लागणे, पिसं लागणे, मुतात मासळया मारणे, ताकाला तूर लागू न देणे, तोंडाला टाचा घालणे, भग देणे, जीव जाळणे असे अनेक

वाक्प्रचार नामदेव कांबळे यांनी या कादंबरीत नेमका आशय दर्शविण्यासाठी वापरले आहेत.

**पुरुष भाषा व स्त्रीभाषा-**

सोपी अनलंकृत भाषा व घरगुती वातावरण यांच्या प्रत्येक नामदेव कांबळे यांच्या कादंबऱ्या मधून येतो. त्यांनी स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन समर्पक भाषेत केले आहे. स्त्रियांच्या बोलण्यामधील वाक्प्रचार, त्यांची बोलण्याची पद्धत या गोष्टी अस्पर्श, राघववेळ, ऊनसावली, मोराचे पाय, सांझरंग, सेलझाडा, कृष्णार्पण, झाकोळ इत्यादी कादंबऱ्यांमधून जाणवतात. राघववेळ या कादंबरीत वालंबीची भाषा उल्लेखनीय आहे. स्त्रियांच्या बोलण्यामध्ये वाक्प्रचार येतात. गजरीने धाडकन दार उघडले तेव्हा दरवाज्याच्या बाहेर कौसी उभी होती. यावर गजरी कौशीवर कडाडली, काय करायली व इथी माह्या सवतीचे सवती. कोणं सांगलं व तुले माह्यावर राखण ह्रयाले."[६] कौसीला तिच्या सासूने सवती शब्दाने संबोधले. स्त्रीला राग अनावर झाला की ती समोरच्या व्यक्तीला घालून पाडून बोलते. "चूक तर आपलीच ह्ये. आपूनच पाठुलं बायकोले. काय तरी करू नाही ते केलं आसन त्यान. त्या बिगरच का बायको इतकी चिडली आपल्यावर ? त्याच्या मायचीत्त. आसं वाटते का जावावा, नड्डीच धराव लेकाची."[७] बोली भाषेतून स्पष्ट झालेली मनातील भाषा आणि सामाजिक परिस्थिती व्यक्तीला शिव्या देण्यास प्रव्रुत्त करतात. उदा. फोदीचे, छिलेल, हजारबीजा, मायचीत, कैदासाने, अवदसा, आग, जाळ, भवानी, बोझवी, बहाड्या, सवती इत्यादी शिव्या या कादंबरीतील पात्राकडून व्यक्त झालेल्या आहेत.

**वातावरण –**

'राघववेळ' या कादंबरीतील वातावरण यथार्थ आहे. पुढील पावसाळ्याचे वर्णन पहा : "पावसाने फणा उभारला. आभाळ ढगांनी भरून गेले. काजळागत काळकुट्ट झाले. विजा कडाडू लागल्या. ढग गर्जु लागले. दिवसरात्र पाऊस पडू लागला."[८] कांबळे यांनी पावसाळी वातावरणाचे चित्रण केले आहे. सततच्या पाणीझडीमुळे गरीब लोकांचे अतिशय हाल होतात, त्यांना काम मिळत नाही, घरी बसून राहावे लागते, काम नसल्यामुळे काही वेळेला त्यांना उपाशी राहावे लागते. "नवरा असता तर ही पह्यी व्हती कां ? निव्वळ भाजीच खा लागली आस्ती का लेकरायले ? काहीच नसतं का घरात ? नसतं बी पण नवऱ्यानं धा घराले ठोकरा मारल्या आसत्या. काही ना काही आणून त्याह्याच्या पुढी ठुल आस्त."[९]

वालंबीच्या मनात आपल्या पतीविषयी च्या भावना जागृत होतात. गरीबीमुळे आणि पावसाच्या झडीमुळे मुलांना फक्त अंबाडीची भाजी खावी लागते. कळणू मात्र गावात जाऊन मुलांच्या खाण्याची व्यवस्था करतो. गरीब परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्ती पुढे माणसाचे काहीच चालत नाही. "समदे नका बसू.' ज्याह्यनं लाकडं फोडले असतील तेच बसा. पंगतीतील जापणी माणसे नारायणाच्या बोलण्याने एकमेकाकडे पाहू लागली. मुलांना मात्र नारायणच्या बोलण्याचे आणि मांगानी एकमेकाकडे पाहण्याचे काहीच वाटले नाही. कधी वाढ होते आणि आपल्याला जेवायला मिळते त्याचीच ते वाट पाहू लागले आहेत."[१०] जेवणासाठी वाट पाहत असणारे लहान मोठे माणसाच्या मनातील भावभावनांचे चित्र लेखकाने येथे चितारले आहे. लहान मुलांनी लाकडं फोडली नव्हती, पण मोठ्या माणसासोबत छोटे मुल पण जेवायला बसले होते. सगळे बसू नका असं म्हटल्यावर, मोठी माणसे एकमेकांकडे पाहू लागले. देवाचा प्रसाद हा सर्वांसाठीच असतो असे मुलांनाही वाटायला लागतो आणि आम्हालाही खायला मिळणार हा आनंद त्यांना वाटतो पण यामध्ये छोटे आणि मोठ्यांची निराशा मात्र झाली.

बैलपोळयामध्ये मांगाच्या मागची गडबड त्या दिवसापुरतीच असते. सायंकाळच्या जेवणासाठी काही घरांनी विविध कामे पूर्ण केली, पायरूने एका माळयाच्या दारात आखारावरती दोन टोपली मुरूम आणून टाकले,

शिवाय शिवऱ्या मुरून टाकण्यासाठी गोपाळराव देशमुख यांचे घर निवडतो. सुदाम आणि पांडुरंग पाटलाचे अंगण मुरुमाने झाकून देतो. दगडू दोन-तीन मुठी काटक्याची मोळी बांधतो. सदाशिवने मुरूम लांड्याच्या घरी टाकले. पोळा हा सण मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात साजरा केला जातो. बैलांना झुल झालर लावून सजविला जाते. त्या बैलांना पोळ्यात नेले जाते. अशा पद्धतीने प्रत्येकाने आपापल्या परीने मोठ्या व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांना शेतीच्या कामात मदत केली आहे उदाहरणार्थ मोड टाकणे, टोपली देणे इत्यादी.

**संघर्ष**-

या कादंबरीतील नायिका वालंबी ही आहे हिच्या जीवनातील अनेक संघर्ष कांबळे यांनी वर्णन केलेले आहे. वालंबीचा संघर्ष हा तिच्या जीवनातील प्रतिकूल परिस्थितीशी आहे. वालंबीचा पती कळणू याचे निधन झाले. त्यानंतर वालंबीनी आपल्या तीन मुलांचे पालनपोषण केले. त्यांना शिक्षण देऊन आपल्या पायावर उभे केले. त्यासाठी वालंबीने प्रत्येक संघर्षाला सामोरे जात राहिली. रघुची मॅट्रिकची परीक्षेची फी, सोनकर सरांकडे दूध घेणे, त्या बदल्यात तिचे पैसे घेणे, मॅट्रिक परीक्षा फॉर्म भरणे, यामध्ये वालंबीला खूप संघर्ष करावा लागतो. पोटाची भूक भागविण्याकरिता अनेक प्रसंगाला सामोरे जाते जावे लागते पावसाळ्यात मोलमजुरीची कामे मिळत नव्हते तरीही वालंबी मात्र डगमगली नाही बिकट परिस्थितीतही ती खंबीर होती. सिताराम रघु आणि कौसी हे वालंबीचे मुलं यांनीही प्रतिकूल परिस्थितीतही वालंबीची मदत केली. सितारामने धोंडी मागणे, तेव्हा अंगावर सतत पाणी पडत असल्याने आजार ओढवणे, रात्री ताप येणे, दवाखान्यात नेण्यासाठी पैसे नसणे, यादव पाटील यांच्याकडे वालंबीने पैसे मागणे, परंतु पैशाच्या मोबदल्यात वालंबीशी अनैतिक चाळे करण्याच्या प्रयत्न करणे इत्यादी प्रसंगाला वालंबी तोंड देत होती. याही प्रसंगाला वालंबी नकार देऊन बाहेर येते. ती अतिप्रसंग ओढवून घेत नाही. वालंबी स्वतःच्या मनाशी विचारांशी संघर्ष करीत असते.

वालंबी मुलांना पोटभर जेवण मिळण्यासाठी अंबाडीच्या भाजीत पीठ कालवून भाजी बनवून देते. हे मांग वेटाळातील मुली मुले- मुली ग्रहण मागत असतात. तेव्हा कौसीवरही अतिप्रसंग होण्याचा प्रयत्न होत असतो. हरणी पायरूची बायको गरिबीत दिवस काढत असतात. पायलीभर ज्वारीसाठी गोपाळ रावांकडून हरणीची अब्रू लुटली जाते. हरणीला पोटाच्या भुकेची तीव्रता आपल्या चारित्र्यापेक्षा महत्त्वपूर्ण वाटते. तरीदेखील प्रतिकूल परिस्थितीअभावी शील भ्रष्ट होण्याच्या घटना घडत असतात. पण वालंबी मात्र आपली शिलता वाचविण्याच्या प्रयत्न करीत असते.

रघु हा मातंग समाजातील असल्यामुळे उच्च वर्णीयांकडून त्याचा अपमान होतो. तो ते क्षण पचवितो. बकाल सरांकडून त्याच्यावर झालेल्या अन्यायाचा परिणाम रघुच्या संवेदनशील मनावर होतो. कौसाचे लग्न डोंगरकिन्हीच्या यादवांशी होते. तिची सासू गजरी ही कौसाला खूप त्रास देत असते. ती कंसाला भुजंगरावाकडे कांदे साफ करण्यास पाठविते. तेव्हा भुजंगरावाकडून कौसा वासनेची बळी पडते हा प्रसंग कौसावर गजरी मुळे उद्भवतो.

दलित बहुजन संघर्षाचा अविष्कार निश्चितच लक्षणीय रीतीने राघववेळ कादंबरीत प्रकटले आहे. ग्रामीण भागातील दलित जातीचे दुःख, या दुःखाला कारण असणारी व्यवस्था यांच्या शोध या कादंबरीतून प्रत्ययकारकरीत्या घेतला जातो. दलित लोकांना दारिद्र्य, उपासमार आणि दुसऱ्यावर निर्भर होऊन जीवन जगावे लागते. या सगळ्यातून त्यांची संघर्षाची वाट तयार होते. नंदा मेश्राम म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करून बहुजन वर्गाचा दर्जा उंचावण्यासाठी ज्या गोष्टीची आवश्यकता होती. त्या सर्व मिळण्याचे स्वातंत्र्य बहुजन आणि प्राप्त करून दिले. तरीही मांग समाज त्यापासून काहीसा वंचित राहिला. कितीही सोयी सवलती मिळल्या तरी मांग समाजाच्या वाट्याला तेच दारिद्र्य तीच भूक तेच शोषण तीच मुस्कटदाबी मारहाण हे आहे."[११]

याचे चित्रण नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' या कादंबरीमध्ये केलेले आहे.

**समारोप -**

ग्रामीण भागातील दलित जातीचे दुःख, या दुःखाला कारण असणारी व्यवस्था यांच्या शोध या कादंबरीतून कांबळे यांनी घेतला आहे. दलित लोकांना दारिद्र्य उपासमार आणि दुसऱ्यावर निर्भर होऊन जीवन जगावे लागते या सगळ्यातून त्यांची संघर्षाची वाट तयार होते. 'राघववेळ' या कादंबरीतील मुख्य पात्रे आणि गौण पात्रे यांच्यातील संवाद सजीव वाटतात. ही कादंबरी ग्रामीण बोलीभाषेत असून लेखकाची निवेदन पद्धती ही प्रमाणभाषेत आहे. विशिष्ट परिस्थितीत पुरुषभाषा व स्त्रीभाषा ही बदलत असते. त्यामध्ये वातावरणानुसार व्यक्तींच्या आयुष्यात चढ,उतार दिसून येतो. या कादंबरीतील नायीकीनीचा संघर्ष तिच्या प्रतिकूल परिस्थितीशी आहे. बोली भाषेतून स्पष्ट झालेली मनातील भाषा आणि सामाजिक परिस्थिती व्यक्तीला शिव्या देण्यास प्रवृत्त करतात. उदा. फोदीचे, छिलेल, हजारबीजा, मायचीत, कैदासाने, अवदसा, आग, जाळ, भवानी, बोझवी, बहाड्या, सवती इत्यादी शिव्या या कादंबरीतील पात्राकडून व्यक्त झालेल्या आहेत.

**संदर्भ सूची -**


- नामदेव कांबळे, राघववेळ, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स,पुणे, प्रथमावृत्ती १९९३, पृ.२
- तत्रैव, नामदेव कांबळे, राघववेळ, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स,पुणे, प्रथमावृत्ती १९९३,पृ.३)
- तत्रैव नामदेव कांबळे, राघववेळ पृ.३६
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ पृ.८७
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ प्रस्तावना पृ.६
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ पृ. ७०
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ पृ.१२
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ पृ. १
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ पृ.५
- ऊनी, नामदेव कांबळे, राघववेळ पृ.१९
- मेश्राम नंदा, दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल पब्लिकेशन,प्र.आ.२००६ पृ. ३१६